आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२८ जुलै २०२४ - रविवार

येत्या १५ ऑगस्ट निमित्त हर घर तिरंगा अभियानात सहभागी होत संकेतस्थळावर तिरंग्यासोबतचा फोटो अपलोड करावा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. हर घर तिरंगा हे अभियान तिरंग्याचा गौरव करणारा उत्सवच झाला असल्याचं ते म्हणाले.

*****होल्ड - प्रधानमंत्री - हर घर तिरंगा ******

स्वातंत्र्य दिनानिमित्त होणाऱ्या भाषणासाठी दरवर्षीप्रमाणेच यंदाही नागरिकांनी MyGov किंवा NaMo App वर सूचना पाठवण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय गणितीय ऑलिम्पियाड स्पर्धेतले पदक विजेते पुण्याचे आदित्य वेंकट गणेश आणि सिद्धार्थ चोप्रा, दिल्लीचा अर्जुन गुप्ता, ग्रेटर नॉयडा इथला कणव तलवार, मुंबईचा ऋषील माथुर आणि गुवाहाटीचा आनंदो भादुरी यांच्याशी त्यांनी संवाद साधला.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी हातमाग आणि इतर स्थानिक उत्पादनं लोकप्रिय करण्यासाठी देशभरातल्या महिलांच्या प्रयत्नांची माहिती दिली. यात त्यांनी महाराष्ट्राची पैठणी तसंच विदर्भातली हँड ब्लॉक प्रिंट या हातमाग उत्पादनांचाही उल्लेख केला.

वाघ आणि मानवी संघर्ष संपुष्टात आणण्यासाठी, तसंच वाघांच्या संरक्षणासाठी देशभरात सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. याचं उदाहरण म्हणून त्यांनी राज्यातल्या ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पाचाही उल्लेख केला.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विविध राज्यांमध्ये नवीन राज्यपालांची नियुक्ती केली आहे. सध्याचे झारखंडचे राज्यपाल सी. पी.राधाकृष्णन यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती केली आहे. तर, विधानसभेचे माजी अध्यक्ष हरी भाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती केली आहे.

तेलंगणात, त्रिपुराचे माजी उपमुख्यमंत्री जिष्णू देव वर्मा यांची, सिक्कीममधे माजी राज्यसभा खासदार ओमप्रकाश माथुर, झारखंडमधे माजी केंद्रीय मंत्री संतोष कुमार गंगवार, छत्तीसगडमधे माजी खासदार रामेन डेका, तर मेघालयात कर्नाटकचे माजी मंत्री सी एच विजय शंकर यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती केली आहे.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांचा शपथविधी आज विधानभवनातल्या मध्यवर्ती सभागृहात झाला. विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी नवनिर्वाचित सदस्यांना शपथ दिली. पंकजा मुंडे, सदाभाऊ खोत, परिणय फुके, योगेश टिळेकर, अमित गोरखे, भावना गवळी, कृपाल तुमाने, प्रज्ञा सातव, राजेश विटेकर, शिवाजीराव गर्जे, आणि मिलिंद नार्वेकर या सदस्यांनी शपथ घेतली.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या एल्गार परिषद प्रकरणात अटकेत असलेल्या आरोपींचा जामीन मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळला आहे. शोमा सेन, रोना विल्सन, सुधीर ढवळे, महेश राऊत आणि सुरेंद्र गडलिंग यांनी जामिनीसाठी याचिका दाखल केली होती. या सर्वांना २०1८ साली अटक करण्यात आली होती.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यात काल रात्रीपासून पडणाऱ्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. वैनगंगा नदी दुथडी भरून वाहत असून गोसेखुर्द धरणाचे २७ दरवाजे उघडले आहेत. लाखनी तालुक्यात अनेकांच्या घरात पावसाचं पाणी शिरून जनजीवन विस्कळीत झालं आहे.

नांदेड इथल्या विष्णुपूरी प्रकल्पाचा १ दरवाजा उघडला असून प्रकल्पातून १५ हजार २९७ क्युसेस पाणी गोदावरी नदीत सोडण्यात आलं आहे.

<><><><><>

नवी मुंबईतल्या शिळफाटा इथल्या मंदिरात आश्रयासाठी गेलेल्या महिलेवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याप्रकरणी आज नागरिकांनी नवी मुंबईत मोर्चा काढला. हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा आणि आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, यातल्या दोषींवर आरोपपत्र दाखल करून हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल ठाणे आणि नवी मुंबईचे पोलीस आयुक्त, तसंच गृह विभागाच्या मुख्य सचिवांना दिल्या.

<><><><><>

नवी मुंबईच्या वाशी सेक्टर ९ मधल्या हिट अँड रन प्रकरणात दोन आरोपींना काल रात्री उशिरा अटक करण्यात आली आहे. शनिवारी दुपारी एका कारनं दिलेल्या धडकेत रिक्षाचालकाचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीनं दोन्ही आरोपींना अटक केली.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज महिलांच्या १० मीटर एअर रायफलमध्ये भारताच्या रमिता जिंदालनं अंतिम फेरी गाठली. तिनं ६३१ पूर्णांक ५ दशांश गुणांची कमाई करून पाचवं स्थान मिळवलं. नौकानयनपटू बलराज पन्वर यानं उपांत्यपूर्व फेरीतलं स्थान नक्की केलं. बॅडमिंटनमध्ये पी. व्ही. सिंधू हिनं सलामीच्या लढतीत आपल्या प्रतिस्पर्ध्यावर २१-९, २१-६ अशी सहज मात केली.

दरम्यान, महिलांच्या १० मीटर एअर पिस्टल प्रकारात मनू भाकर हिची पदकासाठीची लढत आज होणार आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमध्ये आशिया चषक टी ट्वेंटी स्पर्धेचा अंतिम सामना आज भारत आणि यजमान श्रीलंका यांच्यात होत आहे. भारतीय संघानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, पुरुष क्रिकेटमध्ये तीन सामन्यांच्या टी ट्वेंटी मालिकेतला दुसरा सामना आज संध्याकाळी सात वाजता पल्लेकेले आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणार आहे.

<><><><><>

मध्य प्रदेश, छत्तीसगड, विदर्भ, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि गोवा या भागांत काही ठिकाणी मुसळधार पाऊस होईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तसंच गुजरातला मुसळधार पावसाचा रेड अलर्ट आज देण्यात आला आहे.

//<><><><><>//